ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

URA

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

**EDITOR IN CHIEF**
**Dr. BALAJI KAMBLE**

Scanned with CamScanner

संदर्भ ग्रंथ

IMPACT FACTOR 1.0086

ISSN -2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Vol. - VI, Issue - X,
Year - V(Half Yearly)
Mar. 2015 To Aug. 2015

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Yu Takamino
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD
College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue
of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

Dr. Sadanand H. Gone
Principal, Ujwal Gramin
Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

Dr. Balaji S. Bhure
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITOR**

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

**CO-EDITORS**

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Sandip J. Nikam
Dept. of English,
K.T.H.M. College,
Nashik, Dist. Nashik.(M.S.)

Dr. Shivaji Vaidya
Dept. of Hindi,
B. Raghunath College, Parbhani,
Dist. Parbhani. (M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

Scanned with CamScanner

Vol. VI, Issue : X
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 1.0086
ISSN 2229-4406
Mar. 2015 To Aug. 2015

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Need For Innovations In Rural Finance System In India | Dr. Satyen P. Sitapara | 1-5 |
| 2 | Black Money And Indian Tax Structure | Dr. Uttam D. Kadam | 6-13 |
| 3 | India's Nutrition Challenges And Its Impact On Beneficiaries | Foram P. Pandya | 14-22 |
| 4 | Foreign Direct Investment In India: Challenges And Opporunity | Dr. P. T. Pawar | 23-29 |
| 5 | Food Security In India | Dr. Ajay W. Pethe | 30-36 |
| 6 | Go Green With Cloud To Save Environment | Mahindra P. Mukhedkar | 37-44 |
| 7 | Inclusive Growth For Emerging Global Economy (A Study On Role Of Financial Sector) | Induben K. Kumbhani | 45-52 |
| 8 | Agricultural Productivity Of Selected Crops In Nanded District Of Maharashtra | Dr. Manjunath P. Mankari, Santosh K. Mangnale | 53-60 |
| 9 | Higher Education In India | Hardik H. Chavada | 61-68 |
| 10 | हिंदी कहानियाँ में चित्रित समस्याएँ | सौ. मोहिनी रणजित कुटे | 69-73 |
| 11 | भारतातील काळा पैसा आणि दारिद्र्य | डॉ. प्रभाकर आठवले | 74-80 |
| 12 | आर्थिक विकासातील अडथळा - काळा पैसा | संकेत पेडनेकर | 81-85 |
| 13 | उच्च माध्यमिक स्तरावरील शालेय वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास | सौ. अनिता भालतिलक, डॉ. शांताराम गो. बुटे | 86-89 |
| 14 | संत कवयित्रींच्या स्त्रीविषयक जाणीवा | डॉ. जयदेवी पवार | 90-93 |
| 15 | मधुकरराव चौधरी एक कुशल प्रशासक : एक दृष्टीक्षेप... | संजय वामनराव भोळे, डॉ. के.जी. पोकळे | 94-98 |
| 16 | लोकप्रशासनातील नव विचार | डॉ. व्यंकट विळेगावे | 99-101 |



Scanned with CamScanner

URA Vol. VI, Issue : X
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 1.0086
ISSN 2229-4406
Mar. 2015 To Aug. 2015


15

# मधुकरराव चौधरी एक कुशल प्रशासक : एक दृष्टीक्षेप...

**संजय वामनराव भोळे**
राज्यशास्त्र विभाग,
अण्णासाहेब र.भा. गरुड महाविद्यालय,
शेंदुर्णी, जि. जळगाव

**डॉ. के.जी. पोकळे**
राज्यशास्त्र विभाग,
राजुरीचे कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड

Research Paper - Political Science

**प्रास्ताविक :-**

मधुकरराव चौधरी यांची महाराष्ट्राच्या राजकारणात व प्रशासनाविषयक कार्यात कुशल प्रशासक व दृष्टाराजकारणी म्हणून ओळख आहे. मधुकरराव चौधरी यांची महाराष्ट्राच्या राजकारणतील वाटचाल न्यायी प्रशासक म्हणून सुद्धा ओळखली जाते. कारण महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात २१ वर्ष विविध खात्यांच्या मंत्रीपदी व ५ वर्ष महाराष्ट राज्य विधान सभापती म्हणून काम करतांना १३ प्रशासकीय विभागाची धुरा मधुकरराव चौधरी यांनी सांभाळली आणि महाराष्ट्रातील जनतेसाठी कार्य केले. याचे उदाहरणे महाराष्ट्राच्या राजकारणत सापडतात. केवळ एक राजकारणी नव्हे तर उत्तम प्रशासक म्हणून त्यांची ओळख प्रशासकीय पातळीवर व जनमानसात असल्याची दिसते.

महाराष्ट्राच्या राजकारणात,मंत्रीमंडळात अनेक मंत्रीपदावरील खात्याची जबाबदारी संभाळतांना व कार्य करतांना मधुकरराव चौधरी यांनी प्रशासनात कार्य करणाऱ्या नोकर वर्गाला विश्वासात घेउनच आपले उद्दीष्ट्ये पूर्ण केल्याचे दिसते. केवळ एकांगी विचार करून व निर्णय घेउन कोणतीही कृती यशस्वी होत नाही. यावर मधुकरराव चौधरी यांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांची प्रशासनातील भुमीका केवळ एकांगी नसल्याचे दिसते.

मधुकरराव चौधरी यांनी हाती घेतलेले कार्य चांगल्या रितीने यशस्वीपणे पार पाडल्याची अनेक उदाहरणे त्यांच्या कार्यपद्धतीत सापडतात. म्हणून आजच्या काळात चांगल्या व यश्स्वी प्रशासनासाठी मधुकरराव चौधरी यांचा दृष्टा प्रशासकीय विचार काळाची गरज झाल्याची दिसते.

Scanned with CamScanner

**शोध निबंधाची उद्दीष्टे :-**

१. मधुकरराव चौधरी यांचा कुशल प्रशासकीय दृष्टीकोन स्पष्ट करणे.

२. शासन आणि प्रशासन या मध्ये सन्वयय साधणारा नेता म्हणून मधुकरराव चौधरी यांची भुमीका स्पष्ट करणे.

३. महाराष्ट्राच्या राजकारणातील व प्रशासनातील मधुकरराव चौधरी यांच्या तटस्थ भुमीकेचा आढावा घेणे

४. सत्ता ही समाज विकास केंद्रीत असावी असा मधुकरराव यांचा दृष्टीकोण होता हे स्पष्ट करणे.

**मधुकरराव चौधरी यांचा जीवन वृतांत व जडणघडण :-**

मधुकरराव चौधरी यांचा जन्म स्वातंत्र्य लढयातील काळात धनाजीनाना रावजी चौधरी व आई सरस्वतीबाई चौधरी यांच्या उदरी १६ जून १९२८ रोजी नाशिक येथे झाला. चौधरी कुटूंबातील दुरदृष्टीचे नेतृत्व म्हणून त्या काळात नानारावजी यांना ओळखले जात होते. स्वातंत्र्य लढयात अग्रभागी असलेल्या या चौधरी कुटूंबाने मधुकरराव चौधरी यांच्यावर राष्ट्रसेवा व स्वावलंबनाचा संस्कार जन्मापासूनच घडविला होता.

मधुकरराव चौधरी यांचा जन्म झाला त्यावेळी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यासाठी मा.गांधी, डॉ.राजेंद्रप्रसाद,पं.नेहरू व त्याकाळात अनेक राष्ट्रभक्त जनतेला साद घालत होते. याच काळात मधुकराराव चौधरी यांचे वडील धनाजी नाना चौधरी यांनी ब्रिटीशांच्या सेवेस असलेली उच्चपदस्य नोकरी सोडून भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला आणि मधुकरराव चौधरी यांच्यावर कळत नकळत या विचाारांचा प्रभाव झाला.

चौधरी कुटूंब मुळचे खानदेशातीलच रहिवासी होते. खिरोदा जि.जळगांव या गावात मधुकरराव चौधरी यांचे बालपण गेले. १९३१ साली खिरोदा जि.जळगांव येथे स्वराज्य आश्रमाची स्थापना धनाजी नाना चौधरी व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी केली व स्वदेशीला चालना देणारा विचार या आश्रमातून सुरू झाला, खादी विणकाम,रंगकाम,सुतकताई याची सुरूवात येथे झाली व स्वातंत्र्य लढ्यात हा परिसर अग्रभागी असल्यामुळे २७ डिसेंबर १९३६ साली राष्ट्रीय कॉंग्रेसने ग्रामिण भागातील अधिवेशन घ्यायचे ठरविले व फैजपुर जि.जळगांव या गावाची निवड झाली व हे अधिवेशन पार पडले.

**मधुकरराव चौधरी यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील व प्रशासनातील भुमीका व कार्य :-**

मधुकरराव चौधरी १९५७ साली महाराष्ट्राच्या राजकारणात आले व पहिल्याच विधानसभा निवडणूकीत त्यांना भरघोस मतांनी विजय मिळाला आणि पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात महसूल उपमंत्री म्हणून जनतेच्या समस्या सोडविण्याची संधी त्यांना मिळाली. मधुकरराव चौधरी

Scanned with CamScanner

यांनी पहिल्यांदाच महाराष्ट्र प्रशासनावर उत्कृष्ट प्रशासक म्हणून आपला ठसा उमटविला. मधुकरराव चौधरी यांनी प्रशासकीय भुमीकेतून केलेल्या कार्याचा आढावा त्यांच्या मंत्रीमंडातील कारकिर्दीत सापडतो.

**उर्जा व पाटबंधारे मंत्री :-**

या खात्याच्या माध्यमातुन काम करतांना मधुकरराव चौधरी यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी इरिगेशन दरबार ही संकल्पना अस्तित्वात आणून अधिकारी वर्ग व शेतकरी वर्ग यांच्यात समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केले आणि जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अधिकरी वर्ग व शेतकरी यांच्यात समन्वय झाला पाहिजे हे दाखवून दिले. ही उत्कृष्ट प्रशासकाची कामाची पद्धत असते हे यावरून दिसते.

मधुकरराव चौधरी यांनी जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्रीपद म्हणून काम करतांना जनतेचे प्रश्न सोडविणे हे लोक प्रतिनिधीचे कर्तव्य आहे हे ओळखून जनता दरबार ही संकल्पना राबवून लोंकाच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य क्रम दिला व आपली लोकाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून प्रतिमा निर्माण केली. त्यांच्या या काम करण्याच्या कुशल हातोटीमुळे त्यांना खानदेशात लोकसेवक मधुकरराव चौधरी या नावाने ओळखतात. ही त्यांच्या उत्कृष्ट प्रशासक म्हणून केलेल्या कार्याची पावती आहे.

**महसुल उपमंत्री :-**

मधुकरराव चौधरी यांनी दुसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात महसूल उपमंत्री म्हणून कार्य केले. प्रशासनातील कर्मचाऱ्यांना मदतीला घेवुन त्याकाळात पडीक जमीनीचा सर्वे केला. त्याकाळात दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या दलीत चळवळीला सहकार्य करून दलीतांना पडीत जमीनी मिळवून दिल्या आणि या कार्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी मधुकरराव चौधरी हे दिशादर्शक नेतृत्व आहे. असे उद्‌गार काढले. महाराष्ट्रातील राजकारण व प्रशासनाला मधुकररावांसारख्यांची गरज़ आहे असे सांगीतले.

**नगरविकास मंत्री :-**

नगरविकासमंत्री म्हणून काम करतांना मधुकरराव चौधरी यांनी प्रशासनाच्या मदतीने शहरी करणाची वाढती समस्या रोखण्यासाठी प्रयत्न केला. पण अल्पकाळ मिळाल्यामुळे त्यांना फारसे योगदान देता आले नाही.

**आरोग्य विभाग कॅबीनेट मंत्री :-**

आरोग्यमंत्री असतांना मधुकरराव चौधरी यांनी आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केला. हॉस्पीटला जोडून नेत्रपीढयांची स्थापना केली आणि याबरोबरच वैद्यकीय अधिकाऱ्यांना आरोग्य विभागातील नविन संशोधनाला चालना मिळवून दिली. त्यासाठी आयुर्वेद शब्दकोष तयार

Scanned with CamScanner

करून घेतले व डॉक्टरांच्या मदतीने आरोग्य विभाग चांगले सुधारून जनतेच्या आरोग्यासाठी चांगल्या सोयी कशा निर्माण करून देता येतील यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांना आरोग्य विभागातील नविन संशोधनाला चालना मिळवून दिली.

**उत्कृष्ट शिक्षण मंत्री :-**

महाराष्ट्राच्या राजकारणात मधुकरराव चौधरी यांची प्रतिमा केवळ एक राजकारणी किंवा सत्ताभिलाषी अशी नाही. तर उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांची खरी ख्याती असल्याचे दिसते.

शिक्षणमंत्री असतांना मधुकरराव चौधरी हे शिक्षकमित्र शिक्षणमंत्री म्हणून ओळखले जात होते. शिक्षण हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. म्हणून शिक्षण हे चिंतामुक्त कसे होईल यासाठी त्यांची पुरागामी व बदलात्मक भुमीका होती. यासाठी शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आणल्याचे दिसून येते.

मधुकरराव चौधरीयांनी शिक्षणमंत्री असतांना पुणे येथे माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना करून या विभागातील लोकांची गैरसोय टाळली, महाराष्ट्रातील शिक्षकांच्या वेतणश्रेणी सेवासुरक्षा,निवृत्ती वेतन इ.च्या समस्या त्यांनी मार्गी लावल्या.शिक्षणविषयक श्वेतपत्रिका तयार केली या सर्व उत्कृष्ट कार्यामुळे त्यांना २००४ साली नाशिक येथील अधिवेशनात शिक्षणरत्न पदवी देवून गौरविण्यात आले.

**विधानसभा अध्यक्ष :-**

महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्ष म्हणून मधुकरराव चौधरी यांनी २१ मार्च १९९० ते १९९५ या पाच वर्षाच्या काळात यशस्वी विधानसभा अध्यक्ष म्हणून कार्य केले.

मधुकरराव चौधरी यांनी विधानसभा अध्यक्ष असतांना सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या मनात निपक्षपाती व तटस्थ भुमिका घेणारा अध्यक्ष म्हणून आपली प्रतिमा निर्माण केल्याचे अनेक घटना आहेत.

विधानसभाध्यक्ष असतांना अनेक वेळा विरोधी पक्षांनी त्यांच्या वर आरोप केले पण मधुकरराव चौधरी यांची तटस्थ व निपक्षपातीपणाची भुमिका पाहुन विरोधी पक्षातील नेत्यांना सुध्दा मधुकरराव चौधरी यांची जाहिर माफी मागून आपले आरोप परत घ्यावो लागत असत. परंतु मधुकरराव चौधरी यांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्याला अन्यायात्मक वागणूनक दिल्याचे आढळून येत नाही. या उलट मधुकरराव यांचा नेहमी सन्मानच केल्याचे दिसते.

**सारांश :-**

मधुकरराव चौधरी हे महाराष्ट्राच्या राजकारणात २१ वर्षे महाराष्ट्र राज्य मंत्री मंडळाच्या व ५ वर्ष विधानसभा अध्यक्ष म्हणून सत्तेच्या पटलावर काम करत असतांना कधीही सत्ताभिलाषी वागले नाहीत. तर मुल्याधिष्ठीत राजकारण आणि समाजाभिमुख सत्ता यांच्या माध्यमातुन काम

करत असतांना मधुकरराव चौधरी यांनी उत्कृष्ट प्रशासन करून आपल्या कार्यात प्रशासकीय वर्गाला सांभाळुन घेतले आणि प्रशासक व सेवक वर्ग यांच्या मध्ये कसा समन्वय असला पाहीजे हे महाराष्ट्रातील सर्वच स्थरातील घटकांना दाखवुन दिले. यासर्व घडामोडीच्या मागे मधुकरराव चौधरी यांच्या कडे एक उत्कृष्ट प्रशासकांची दृष्टी होती हे जाणवते

एकंदरीतच मधुकरराव चौधरी यांचा प्रशासकीय दृष्टीकोण हा समाजातील व प्रशासकीय पातळीतील घटकांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो म्हणून भविष्यात त्यांच्या प्रशासकीय दृष्टीकोणाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे दिसते.

## संदर्भ सूची

१. चौधरी प्रभात - लोकसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी १६ जून २००७ मुंबई
२. पाटील अशोक रामराव - मधुकरराव उर्फ बाळासाहेब चौधरी लघुसंशोधन प्रबंध (नागपुर) १९८३-८४
३. कामत डॉ.अशोक- ना.मधुकरराव चौधरी शैक्षणीक जीवन कथा प्रकाशक गुरूकुल प्रतिष्ठाण,पुणे डिसेंबर २००६
४. भालेराव अ.फ. - लोकहितैषी बाळासाहेब मधुकरराव चौधरी अंकुर प्रकाशन,अकोला जूलै-२०११
५. चौधरी मधुकर धनाजी - प्रतिज्ञा १९ फेब्रुवारी १९४८
६. चौधरी भानु - कर्मयोगी धनाजीनाना तथा दादासाहेब चौधरी जीवन व कार्य २५ डिसेंबर १९७२
७. चौधरी भानु - पू.भाउसाहेब बोंडे एक समर्पित जीवन जनता शिक्षण मंडळ, खिरोदा २९ डिसेंबर २००६
८. चौधरी शिरीष - गौरवांजली लोकसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी गौरवग्रंथ मुंबई १६ जून २००७
९. मधुकरराव चौधरी - मुलाखत १६ डिसेंबर २००७
१०. मधुकरराव चौधरी - मुलाखत ३ एप्रील २००८
११. मधुकरराव चौधरी - मुलाखत १२ जूलै २००९
१२. महाराष्ट्रविधी मंडळ - महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोस्तव नोंदी प्रकाशक महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव समिती विधानभवन मुंबई - २०११
१३. रामप्रधान - यशवंतराव चव्हाण :- शब्दांचे सामर्थ्य प्रकाशक-यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण मुंबई-२०००

Scanned with CamScanner

ISSN 2229-4406

ISSN 2229-4406

Published, Printed, Owned by Sow. Mahanada Balaji Kamble & Edited by Balaji Kamble & Printed at Jyotichandra Offset Printing & Binding & Published by Jyotichandra Publication, Gyandev-Parvati, R-9/139/6, Near Vishal School, L.I.C. Colony, Pragati Nagar, Latur, Dist. Latur - 413 531 (M.S.) India.

Editor In Chief Dr. Balaji Kamble, Mob. No. 9423346913

Scanned with CamScanner